# कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,


हुपरी - यळगूड, ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)

फोन (०२३०) २४५०४०२ ते ६, ई-मेल : kprjsssk@gmail.com वेबसाईट :www.kallappannaawadejawaharsssk.com


## -- ऊस पिक परिसंवाद --

कारखान्याच्या ऊस विकास योजनेअंतर्गत

**"बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय"**

या विषयावर ऊस पिक परिसंवाद आयोजित केला आहे.

**- कार्यक्रमाचे अध्यक्ष –**

**आदरणीय श्री. कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा),**

संस्थापक चेअरमन

**- प्रमुख मार्गदर्शक -**

**मा. श्री. सुरेश माने-पाटील**

(निवृत्त शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे)

**- प्रमुख उपस्थिती -**

**आदरणीय आमदार श्री. प्रकाशआण्णा आवाडे,**

माजी वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.श्री. बाबासो चौगुले**
व्हाईस चेअरमन

**मा. डॉ. श्री. राहूल आवाडे,**
केन कमिटी चेअरमन

**मा.श्री. सूरज बेडगे**
संचालक

**मा. श्री. आण्णासो गोटखिंडे**
संचालक

तेंव्हा या कार्यक्रमास आपण अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**- स्वागतोत्सुक -**

**किरण कांबळे**
मुख्य शेती अधिकारी

**मनोहर जोशी**
कार्यकारी संचालक

**जयपाल गिरीबुवा**
सि. ॲग्री ओव्हरसियर
(हुपरी विभाग)

**भास्कर पट्टणकुडे**
उपमुख्य शेती अधिकारी

**कार्यक्रमाची वेळ** : गुरूवार दि. २७/०४/२०२३ रोजी सायं. ०५.०० वाजता.

**स्थळ** : यशवंत मंगल कार्यालय, **हुपरी.**




ऊस पिक परिसंवाद




TELI SOUND
PENDAL
तेली बंधू साऊंड



महासत्ता एकच आवृत्ती

# योग्य प्रमाणात खतांचा डोस दिल्यास उत्पादन वाढते

## जवाहर साखर कारखाना येथे ऊसपीक परिसंवाद संपन्न

### सुरेश माने-पाटील

हुपरी, ता.२७ (प्रतिनिधी)-

बदलत्या हवामानात तंत्रज्ञानाची जोड दिली तर ऊस उत्पादन वाढेल सरीतील अंतर सहा फूट व ड्रिप मधून खत आणि पाणी दिल्यामुळे पिकाला पोषक वातावरण तयार होईल योग्यवेळी मशागत योग्य प्रमाणात खतांचा डोस दिल्यास उत्पादन वाढते याकरिता शेतकऱ्याने जागरूक



राहिले पाहिजे, असे मत प्रमुख मार्गदर्शक निवृत्त शास्त्रज्ञ शुगर इन्स्ट्रिस्त पुण्याचे सुरेश माने/पाटील यांनी व्यक्त केले.

ते यशवंत मंगल कार्यालय हुपरी येथे कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखाना आयोजित ऊसपिक परिसंवाद कार्यक्रमात बदलत्या हवामानात ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय या विषयावर बोलत होते अध्यक्षस्थानी सहकारमहर्षी कल्लाप्पाण्णा आवाडे उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी सुरू हंगाम, पहिला, दुसरा व तिसऱ्या हंगामात कुठल्या महिन्यात लागण करावी व कुठले बियाणे वापरावे,अंतर पिके कशी घेतली जातात याची उदाहरणांसह माहिती दिली व कर्नाटकातील कारदगा गावात लक्ष्मण पसारे हे सातत्याने एकरी १०० टन ऊस उत्पादन घेतात सांगली जिल्ह्यात संजय कदम,वाळवा तालुक्यातील दुधारी गावातील अमोल लगे हे एकरी १४५ टन तर तांदूळवाडीतील आनंदराव पाटील हे १५० टन उत्पादन घेत असल्याची माहिती देताना एक डोळा पद्धत व ८६०३२ बेणे वापराचा आवर्जून उल्लेख केला व आपणही नवीन बदलांना सामोरे जावून उत्पादन कसे वाढवावे याची शास्त्रीय माहिती दिली माजी मंत्री व आमदार प्रकाश आवाडे यांनी बोलताना किफायतशीर शेती आणि उत्पादन वाढीसाठी आवश्यक बाबी जवाहर साखर नेहमी उपलब्ध करून देत आहे.यामध्ये खते रोपे जैविक खते यांचा समावेश असल्याचे नमूद करून गांडूळ खतांवर भर द्यावा असे आवाहन केले.स्वागत एमडी मनोहर जोशी यांनी केले. आभार संचालक आण्णासाहेब गोटखिंडे यांनी मानले तर सुत्रसंचलन सुभाष गोटखिंडे यांनी केले यावेळी व्हा.चेअरमन बाबासाहेब चौगुले, केन कमिटी चेअरमन डॉ.राहूल आवाडे संचालक सूरज बेडगे, ताराराणी विकास आघाडीचे प्रकाश दतवाडे (इचलकरंजी), आण्णासाहेब शेंडूरे (हुपरी) पैसा फंड बँकेचे अध्यक्ष आण्णासाहेब भोजे, एमडी शिवराज नाईक, माजी जिल्हा परिषद सदस्य विलासराव खानविलकर, चांदी असोसिएशनचे चंद्रशेखर नाईक विलासराव नाईक, शेती अधिकारी किरण कांबळे, भास्कर पट्टणकुडे, जयपाल गिरीबुवा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# गचे आयोजन

आरती व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. मौजीबंधन सोहळ्यात ८१ मुलांवर संस्कार करण्यात आले. शुक्रवार २८ रोजी विविध कार्यक्रम व विधींसह मूर्तींवर कल्याण संस्कार हा कार्यक्रम होत आहे. हा महोत्सव ३० एप्रिलपर्यंत चालणार असून त्यामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार ३० एप्रिल रोजी सायंकाळी

MAHASATTA EPAPER
Kolhapur, Sangli, Satara, Belgaum Edition.
Date : 28-04-2023 Page No. - Mahasatta_11

तरुण भारत संवाद

# जवाहर कारखान्याच्यावतीने हुपरीत ऊस पीक परिसंवाद

वार्ताहर
हुपरी

नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून, बदलत्या हवामानाचा अंदाज घेऊन शेती करणे ही काळाची गरज आहे. आपल्या शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी पारंपरिक ऐवजी आधुनिक शेतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणेचे निवृत्त शास्त्रज्ञ सुरेश माने–पाटील यांनी केले.

हुपरी, ता. हातकणंगले येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्यावतीने यशवंत मंगल कार्यालय यशवंतनगर येथे ऊस विकास योजनेअंतर्गत बदलत्या हवामानामध्ये ऊस उत्पादन वाढीसाठी उपाय या विषयावर आयोजित ऊस पीक परिसंवादात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे संस्थापक चेअरमन कल्लाप्पाण्णा आवाडे होते. यावेळी आमदार प्रकाश आवाडे, केन कमिटी चेअरमन डॉ. राहुल आवाडे, संचालक सूरज बेडगे, आण्णासो गोटखिंडे, मनोहर जोशी, प्रकाश दत्तवाडे आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते



हुपरी : येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना आमदार प्रकाश आवाडे. बाजूला सुरेश माने–पाटील, कल्लाप्पाण्णा आवाडे, डॉ. राहुल आवाडे आदी.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. कार्यकारी संचालक मनोहर जोशी यांनी यांनी स्वागत व प्रास्तविक केले. आमदार प्रकाश आवाडे म्हणाले,ऊस उत्पादन वाढण्यासाठी योग्यवेळी निर्णय घेणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा अंदाज घेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी. लागेल ते खत, बियाणे, कारखान्याच्यावतीने दिली जातील. गांडूळ खतासाठी गांडूळ खताचा ट्रे देण्याची योजना राबवू. पूर्वी ऊस पाडण्याची पद्धत होती ती पुन्हा चालू करावी. शेतकरी, कारखाना, शासन अशा तीन टप्यात विभागणी करून पीक वाढवण्यासाठी प्रयत्न करा.

सुरेश माने–पाटील पुढे म्हणाले की, या साखर कारखान्याच्यावतीने ऊस उत्पादकांसाठी ऊस पीक परिसंवादासारखे कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. सध्या शेतीसाठी काय उपयुक्त आहे, उत्पन्न वाढण्यासाठी काय गरजेचे आहे याची माहिती ऊस उत्पादकांनी घेणे महत्त्वाचे आहे. सध्या प्रमुख पीक म्हणून उसाकडे शेतकरी पाहतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उसाला प्राधान्य देणारी शेतकऱ्यांची संख्या प्रचंड आहे. सहकारी साखर कारखानेदेखील भरपूर प्रमाणात आहेत. आधुनिकतेचा वापर, ऊस वाढीसाठी लागणारी कंपोस्ट खते, योग्य पाणी, पाचटचे नियोजन याकडे शेतकऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. उत्पन्न क्षेत्र वाढवण्यासाठी पारंपरिक ऐवजी आधुनिक शेतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

यावेळी कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते व आमदार प्रकाश आवाडे, डॉ. राहुल आवाडे, कार्यकारी संचालक मनोहर जोशी यांच्या मान्यवरांच्या उपस्थितीत सुरेश माने–पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शेखर पाटील, आण्णासाहेब शेंडुरे, आप्पासाहेब पाटील, आणासाहेब भोजे, शिवराज नाईक, चंद्रशेखर नाईक, विलासराव नाईक, माजी जिल्हा परिषद सदस्य विलासराव खानविलकर, सदाशिव वाईंगडे, मोहन खोत, राजू नाईक, सागर गाट, शरद माळी, उदय पाटील, सरताज नाईकवडे, मुख्य कृषी अधिकारी किरण कांबळे, उप कृषी अधिकारी भास्कर पट्टणकुडे, जयपाल गिरी, अमित चौगुले, कर्मचारी आणि सभासद शेतकरी उपस्थित होते. आभार आण्णासाहेब गोटखिंडे यांनी मानले.